Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**प्राधिकृत प्रकाशन**

वर्ष ५, अंक ३८] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १९-२५, २०१९/भाद्रपद २८-आश्विन ३, शके १९४१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ३०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक–नागपूर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-४ |
| **भाग एक-अ.**–(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-१८ |


## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४१०.

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्रमांक १), यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१८.**

क्रमांक कलि-उजि(भू.)-वि.पा.वि.म.-कावि-९६९-२०१९.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र. ७७-७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा

करण्यात आलेला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नागपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आलेला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आलेला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येत की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये, पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्त करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा) ;

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल, त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रर्वतनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्याममुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आलेला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-याची कार्ये पार पाडण्यासाठी व्ही. बी. जोशी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची—एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक २/अ-६५-२०१८-१९-प.ह.नं.-६१, गाव आवरमारा, तालुका कुही, जिल्हा नागपूर.

| अनुक्रमांक | सर्व्हे क्रमांक किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | २९/२ | ० ७० |
| २ | ३२/१ | ० ५५ |
| ३ | ३३ | ० ३६ |

**अनुसूची—एक**—चालू

| (१) | (२) | (३) |
| --- | --- | --- |
| | | हे. आर |
| ४ | ३४ | ० ४० |
| ५ | ३५ | ० ३६ |
| ६ | ३६ | ० ३७ |
| ७ | ३७ | ० ६७ |
| ८ | २५६ | ० ४० |
| ९ | २९८ | ० ४१ |
| १० | ३०५ | ० ३७ |
| ११ | ३०६ | १ २० |
| १२ | ३०७ | ० ३८ |
| १३ | ३०८ | ० २८ |
| १४ | ३०९/१ | ० ३१ |
| १५ | ३०९/२ | ० ३१ |
| १६ | ३०९/३ | ० ३१ |
| १७ | ३०९/४ | ० ७० |
| १८ | ३१०/१ | ० ८३ |
| १९ | ३१०/२/अ | ० ८१ |
| २० | ३१०/२/ब | ० ८१ |
| २१ | ३१२/१ | पूर्व संपादित |
| २२ | ३१२/२ | ० ६९ |
| २३ | ३१३ | ० ४५ |
| २४ | ३१४ | ० ०४ |
| २५ | ३१५ | ० २३ |
| २६ | ३१६ | ० ४२ |
| २७ | ३२० | ० ११ |
| २८ | ३२१ | ० १४ |
| | एकूण क्षेत्र . . | १२ ६१ |

**अनुसूची—दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नांव :— गोसीखुर्द प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन :— गोसीखुर्द प्रकल्प बाधित मौजा आवरमारा, ता. कुही, जि. नागपूरच्या पुनर्वसनसंबंधी प्रस्तावित जमीन संपादित करण्याबाबत.

समाजाला मिळणारे लाभ :— गोसीखुर्द प्रकल्प, पुनर्वसन व सोई सुविधा.

**अनुसूची—तीन**

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

विस्थापीत होत नाही.

**अनुसूची—चार**

| | | |
|---|---|---|
| (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश | :— | भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १०(क) अन्वये महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना दिनांक १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे. |

**अनुसूची—पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम | : | निरंक |
| (आ) | प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | : | निरंक |
| (इ) | ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील | : | निरंक |

**टीप.**—उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**व्ही. बी. जोशी,**
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. १),
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर.

नागपूर :
दिनांक २९ ऑगस्ट २०१९.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४११.

BY ASSISTANT REGISTRAR OF UNIONS

**Recognition of undertaking under Section 11 of the Maharashtra Industrial Relations Act, 1946**

No. MIR-Reg-UND-01-2019.

In exercise of the powers conferred on me under Section 11 of the Maharashtra Industrial Relations Act, 1946, I, U. S. Loya, Assistant Register of Unions, Maharashtra Industrial Relations Act, 1946, Nagpur hereby recognize the following concern in an Industry as an undertaking engaged in Engineering Industry.

| **Sr. No. 842** | **Name of the Establishment :** |
|---|---|
| Dated 3rd September 2019. | M/s Transrail Lighting Ltd., B/1/1 M.I.D.C. Growth Centre Deoli, District - Wardha, Maharashtra. |

U. S. LOYA,
Assistant Registrar of Unions,
Maharashtra Industrial Relations Act, 1946.
Nagpur.

Nagpur :
Dated 3rd September 2019.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.